# -: परीक्षा योजना/पध्दती :-

## महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट क सेवा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नांव | संवर्ग | वेतनसंरचना (Pay Matrix) | नियुक्तीचे ठिकाण | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक कक्ष अधिकारी | अराजपत्रित गट-ब | S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | विविध मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय | ज्येष्ठता व पात्रतेनुसार कक्ष अधिकारी व त्यावरील पदे. |
| २ | राज्य कर निरीक्षक | | | राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्य कर अधिकारी व त्यावरील पदे. |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | | | राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात | ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक पोलीस निरीक्षक व त्यावरील पदे. |
| ४ | दुय्यम निबंधक(श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक | | | राज्य शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उपमुद्रांक अधीक्षक व त्यावरील पदे. |
| ५ | उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय | गट-क | S-१३ : रुपये ३५४००-११२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | राज्य शासनाच्या उद्योग संचालनालयाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब व त्यावरील पदे. |
| ६ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | | S-१२ : रुपये ३२०००-१०१६०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | राज्य शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार निरीक्षक, गट - ब व त्यावरील पदे. |
| ७ | तांत्रिक सहायक, विमा संचालनालय | | S-१० : रुपये २९२००-९२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | राज्य शासनाच्या विमा संचालनालयातील महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार कनिष्ठ तांत्रिक अधिकारी, गट-ब व त्यावरील पदे. |
| ८ | कर सहायक | | S-८ : रुपये २५५००-८११०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्यकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित). |
| ९ | लिपिक-टंकलेखक | | S-६ : रुपये १९९००-६३२०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व राज्य शासनाच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालयामधील संवर्गात | ज्येष्ठता व पात्रतेनुसार संबंधित कार्यालयाच्या आस्थापनेवरील सेवाप्रवेश नियमानुसार उपलब्ध संवर्गामध्ये |
| १० | सहायक मोटार वाहन निरीक्षक | | S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार परिवहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक व त्यापुढील संवर्ग |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार सदर परीक्षेमधून भरतीप्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित असलेल्या सर्व संवर्गाचा तपशील, अराखीव व विविध आरक्षित पदसंख्या, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षा पध्दती:-**

**२.१** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या सर्व संवर्गातील पद भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून ते जाहिरातीमध्ये नमूद एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्गासाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.३** लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी विकल्प देताना संबंधित उमेदवारांकडून ते एक किंवा त्यापेक्षा जास्त नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिपत्याखालील कार्यालयाकरीता अर्ज करु इच्छितात किंवा कसे याबाबत विकल्प घेण्यात येईल व सदर विकल्पाच्या आधारे पुढील भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

**२.४** ऑनलाईन अर्ज सादर करताना संबंधित संवर्गाकरीता दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित संवर्गाच्या पद भरतीकरीता उमेदवाराचा अर्ज समजण्यात येईल/येतील.

**२.५** संयुक्त पूर्व परीक्षेकरीता अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या विविध अराखीव व आरक्षित पदसंख्येच्या आधारे, संबंधित प्रत्येक संवर्गाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.६** फक्त लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता अर्ज करताना उमेदवाराने नियुक्ती प्राधिकारीनिहाय दिलेला विकल्प तसेच नियुक्ती प्राधिकारीनिहाय भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या लक्षात घेवून सामायिक पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.७** संयुक्त पूर्व परीक्षेच्या वरीलप्रमाणे निकालाच्या आधारे संबंधित गट-ब किंवा गट-क संवर्गाच्या प्रत्येक मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची खालीलप्रमाणे मुख्य परीक्षा घेण्यात येतील:-

| अ.क्र. | परीक्षा | संवर्ग |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा | (१) सहायक कक्ष अधिकारी<br>(२) राज्य कर निरीक्षक<br>(३) पोलीस उप निरीक्षक<br>(४) दुय्यम निबंधक(श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक |
| २ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा | (१) उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय<br>(२) दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क<br>(३) तांत्रिक सहायक, विमा संचालनालय<br>(४) कर सहायक<br>(५) लिपिक-टंकलेखक |
| ३ | सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा | सहायक मोटार वाहन निरीक्षक |

**२.८** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या गुणांची किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.९** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत.

**२.१०** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना विविध संवर्गाचा आणि/अथवा लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता नियुक्ती प्राधिकाऱ्याचा दिलेला/ले विकल्प तसेच माहिती अंतिम समजण्यात येईल व त्याच्या आधारेच पुढील भरतीप्रक्रिया होईल.

**२.११** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना विविध संवर्गाचा आणि/अथवा लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता नियुक्ती प्राधिकाऱ्याचा दिलेला/ले विकल्प तसेच अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही.

**२.१२** जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन व आयोगाची फसवणूक समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

## ३. पात्रता :-

**३.१** भारतीय नागरिकत्व.

### ३.२ वयोमर्यादा :-

**३.२.१** वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे

**३.२.२** विविध आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गांसाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

| अ.क्र. | घटक | सहायक कक्ष अधिकारी | राज्य कर निरीक्षक | पोलीस उपनिरीक्षक | दुय्यम निबंधक (श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक | उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | तांत्रिक सहायक, विमा संचालनालय | कर सहायक | सहायक मोटार वाहन निरीक्षक | लिपिक-टंकलेखक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. किमान वयोमर्यादा** | | | | | | | | | | | |
| सर्व उमेदवार | | १८ | १९ | १९ | १९ | १९ | १८ | १९ | १८ | १९ | १९ |
| **२. कमाल वयोमर्यादा** | | | | | | | | | | | |
| २.१ | **सर्वसाधारण/महिला** | | | | | | | | | | |
| | (१) अमागास | ३८ | ३८ | ३१ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ |
| | (२) मागासवर्गीय / अनाथ / आ.दु.घ. | ४३ | ४३ | ३४ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ |



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २.२ | **प्राविण्यप्राप्त खेळाडू** | | | | | | | | | | |
| | (१) अमागास | ४३ | ४३ | ३६ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ |
| | (२) मागासवर्गीय /अनाथ/आ.दु.घ. | ४३ | ४३ | ३६ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ |
| २.३ | **माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी** | | | | | | | | | | |
| | (१) अमागास | ४३ | ४३ | ३६ | ४३ | ३८+ सेवा कालावधी +३ वर्षे | ३८+ सेवा कालावधी+ ३ वर्षे | ३८+ सेवा कालावधी +३ वर्षे | ३८+ सेवा कालावधी +३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | ३८+ सेवा कालावधी +३ वर्षे |
| | (२) मागासवर्गीय / अनाथ/आ.दु.घ. | ४३ | ४३ | ३६ | ४३ | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी+ ३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे | ४३+ सेवा कालावधी +३ वर्षे |
| २.४ | **दिव्यांग** | ४५ | ४५ | अपात्र | ४५ | ४५ | ४५ | ४५ | ४५ | अपात्र | ४५ |
| २.५ | **प्रकल्पग्रस्त** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ४५ |
| २.६ | **भूकंपग्रस्त** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ४५ |
| २.७ | **पदवीधर अंशकालीन कर्मचारी** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५५ |

**३.२.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**३.२.४** प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता असलेले आरक्षण तसेच सोयी-सवलती या केवळ बृहन्मुंबई क्षेत्राबाहेरील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गासाठीच लागू आहेत.

## ३.३. अर्हता:-

### ३.३.१ शैक्षणिक अर्हता:-

**३.३.१.१** उद्योग निरीक्षक तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्ग वगळता इतर सर्व संवर्गाकरीता मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**३.३.१.२** उद्योग निरीक्षक, गट-क संवर्गाकरीता शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे राहील:-

(१) सांविधिक विदयापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा

(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.

**३.३.१.३ सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गाकरीता अर्हता खालीलप्रमाणे राहील:-**

**(१)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी. च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि

**(२)** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील किमान ३ वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता.

**(३)** स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा अत्युच्च अर्हता धारण केलेले वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील.

(४) खालील अर्हता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहेत:-

| अ.क्र. | संदर्भ | अर्हता |
|---|---|---|
| १ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक २३ जानेवारी, २०१७ | **(१)** डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी<br>**(२)** डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग<br>**(३)**डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स<br>**(४)**डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी<br>**(५)**डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग<br>**(६)**डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग<br>**(७)** डिप्लोमा इन मेटॅलर्जी<br>**(८)** बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरींग<br>**(९)** बॅचलर डिग्री इन ॲटोमोबाईल इंजिनिअरींग<br>**(१०)** बॅचलर डिग्री इन प्रॉडक्शन इंजिनिअरींग<br>**(११)** बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग |



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

| | | |
|---|---|---|
| २ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग |
| ३ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन पॅकेजिंग टेक्नॉलॉजी |
| ४ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ | 4 Years Theoretical and Practical Training as an Artificer Apprentice. |

(५) उपरोक्त नमूद पदवी/पदविकांव्यतिरिक्त इतर पदवी/पदविकांच्या समतुल्यतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास यथास्थिती केंद्र शासनाचा अथवा राज्य शासनाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**३.३.१.४** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.३.१.५** संबंधित शैक्षणिक अर्हतेच्या (पदवी अथवा पदविका) शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.३.१.६** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.३.२ अनुभव [फक्त सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गाकरीता]:-**

**३.३.२.१** स्वयंचल अभियांत्रिकी वा यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका/पदवी/अत्युच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांचे अखत्यारीतील यंत्रशाळांमध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक.

**३.३.२.२** अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा अॅप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहित धरला जाऊ शकेल.

**३.३.२.३** मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल त्यांनी नियुक्तीनंतर परिविक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये किमान १ वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.

**३.३.३ वैध अनुज्ञप्ती (License) [फक्त सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गाकरीता]:-**

**३.३.३.१** मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारी गिअर्स असलेली मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेली वैध अनुज्ञप्ती (Licence) आवश्यक.

**३.३.३.२** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादी किंवा दोन्ही वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.

**३.३.३.३** परिविक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

**३.३.३.४** वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती वेळोवेळी नूतनीकरण केली असली पाहिजे आणि

**३.३.४ शारीरिक अर्हता:-**

**३.३.४.१** खालील संवर्गाकरीता विकल्प देणाऱ्या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उपनिरीक्षक | (१) उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| २ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | (१) उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ से.मी. जास्त. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ५० कि.ग्रॅ. |
| ३ | सहायक मोटार वाहन निरीक्षक | (१) उंची - किमान १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. प्रसारणाशिवाय व किमान ५ से.मी. प्रसरण. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ४५ कि.ग्रॅ. |
| | | जे रंगांध नसून, ज्यांची दृष्टी चष्म्यासह वा शिवाय चांगली आहे. | |



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**३.३.४.२** संबंधित संवर्गातील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**३.३.५ टंकलेखन अर्हता:-**

**३.३.५.१** कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे टंकलेखन अर्हता असणे आवश्यक आहे:-

| **कर सहायक** | **लिपिक-टंकलेखक** |
|---|---|
| मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. | मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **किंवा** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**३.३.५.२** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**३.३.५.३** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची विहित टंकलेखन अर्हता आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विशिष्ट दिनांकास अथवा त्यापूर्वी धारण करणे अनिवार्य आहे.

**३.३.५.४** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.१/कार्यासन-१२, दिनांक १२ जानेवारी, २०२३ नुसार केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. तसेच, केवळ मराठी टंकलेखन धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे राहील. अन्यथा संबंधितांची वेतनवाढ रोखण्यात येईल.

**३.३.५.५ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट:-**

**(१)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार दिव्यांग उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**(२)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**(३)** शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ अन्वये अनाथ उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**(४)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, संकीर्ण- १११४/प्र.क्र.२००/१६-अ, दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे प्रकल्पग्रस्त आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

## ४. शुल्क (फी):-

**४.१** प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| **अ.क्र.** | **परीक्षेचे नांव** | **शुल्क रुपये** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **अमागास** | **मागासवर्ग/आ.दु.घ./अनाथ** | **माजी सैनिक** | | |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३९४ | २९४ | गट-ब आणि/अथवा गट-क संवर्ग | | फक्त गट-क संवर्ग |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/ आ.दु.घ./अनाथ | |
| २ | मुख्य परीक्षा (प्रत्येकी) | ५४४ | ३४४ | ३९४ | २९४ | ४४ |



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**४.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५. परीक्षा केंद्र :-**

**५.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ११ | गडचिरोली | २१ | नागपूर | ३२ | सोलापूर | ४२ |
| अकोला | १२ | गोंदिया | २२ | नांदेड | ३३ | ठाणे | ४३ |
| अलिबाग | १३ | हिंगोली | २३ | नंदुरबार | ३४ | वर्धा | ४४ |
| अमरावती | १४ | जळगाव | २४ | नाशिक | ३५ | वाशिम | ४५ |
| औरंगाबाद | १५ | जालना | २५ | उस्मानाबाद | ३६ | यवतमाळ | ४६ |
| बीड | १६ | कोल्हापूर | २६ | परभणी | ३७ | पालघर | ४७ |
| भंडारा | १७ | कुडाळ | २७ | पुणे | ३८ | नवी मुंबई | ४८ |
| बुलढाणा | १८ | लातूर | २८ | रत्नागिरी | ३९ | | |
| चंद्रपूर | १९ | मुंबई (मध्य) | ३० | सांगली | ४० | | |
| धुळे | २० | मुंबई (पश्चिम) | ३१ | सातारा | ४१ | | |

**५.२ परीक्षा केंद्र:-**

मुख्य परीक्षा सर्वसाधारणपणे खालील सहा ठिकाणी घेण्यात येतील:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक | जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| (१) अमरावती | **१४** | (४) नागपूर | **३२** |
| (२) औरंगाबाद | **१५** | (५) नाशिक | **३५** |
| (३) मुंबई | **३०** | (६) पुणे | **३८** |

**५.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हाकेंद्र संबंधित परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच निवडणे आवश्यक आहे.

**५.४** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.५** विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.६** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**५.७** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही, तसेच यासंदर्भातील कोणताही पत्रव्यवहार परस्पर दफ्तरदाखल करण्यात येईल.

**६. परीक्षा योजना :-**

**६.१ संयुक्त पूर्व परीक्षा :-**

**६.१.१ पूर्व परीक्षेचे टप्पे :- एक — लेखी परीक्षा**

| विषय व संकेतांक | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| **१०६१** | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.१.२ अभ्यासक्रम** :-सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'Candidate Information' या सदराखालील 'Examination' अंतर्गत 'Syllabus of Examination' येथे उपलब्ध आहे.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

## ६.२ मुख्य परीक्षा:-

### ६.२.१ मुख्य परीक्षेचे टप्पे —

| अ.क्र. | परीक्षा | संवर्ग | टप्पे |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा | (१) सहायक कक्ष अधिकारी<br>(२) राज्य कर निरीक्षक<br>(३) दुय्यम निबंधक(श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक | फक्त लेखी परीक्षा |
| | | (४) पोलीस उप निरीक्षक | (१) लेखी परीक्षा<br>(२) शारीरिक चाचणी<br>(३) मुलाखत |
| २ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा | (१) उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय<br>(२) दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क<br>(३) तांत्रिक सहायक, विमा संचालनालय | फक्त लेखी परीक्षा |
| | | (४) कर सहायक<br>(५) लिपिक-टंकलेखक | (१) लेखी परीक्षा<br>(२) टंकलेखन कौशल्य चाचणी |
| ३ | सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा | सहायक मोटार वाहन निरीक्षक | फक्त लेखी परीक्षा |

### ६.२.२ लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा** | | | | | | | |
| १ (संकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (संकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | |
| **(२) महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा** | | | | | | | |
| १ (संकेतांक १०६४) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (संकेतांक १०६५) | सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | |
| **(३) सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा** | | | | | | | |
| १ (संकेतांक ००२४) | यंत्र अभियांत्रिकी व स्वयंचल अभियांत्रिकी | १५० | ३०० | पदविका | इंग्रजी | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.२.३ अभ्यासक्रम:**-सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'Candidate Information' या सदराखालील 'Examination' अंतर्गत 'Syllabus of Examination' येथे उपलब्ध आहे.

## ६.३ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन:-

**६.३.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**६.३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**६.४ पूर्व परीक्षेचा निकाल :**

**६.४.१** भरावयाच्या प्रत्येक संवर्गाकरीता तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत प्रत्येक नियुक्ती प्राधिकारी निहाय स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**६.४.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवारांकडून घेतलेल्या विविध संवर्गाच्या विकल्पाच्या आधारे तसेच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या अराखीव व आरक्षित पदसंख्येच्या आधारे संबंधित प्रत्येक संवर्गाकरीता तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत प्रत्येक नियुक्ती प्राधिकारी निहाय भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक आरक्षित प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने गुणांची किमान सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुसऱ्या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित पदावरच निवडी/शिफारशीसाठी पात्र असतील.

**६.४.३** अराखीव (खुला) पदांकरींता निश्चित करण्यात आलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी अराखीव (खुला) पदासाठी विचारात घेतली जाईल. अराखीव (खुला) पदासाठी निश्चित करण्यात आलेली गुणांची किमान सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र ठरतील.

**६.४.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात संबंधित मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.४.६** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.५ मुख्य परीक्षा:-**

**६.५.१ स्वरुप:-**

**६.५.१.१** संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**६.५.१.२** पूर्व परीक्षेकरीता अराजपत्रित गट-ब तसेच गट-क संवर्गासाठी स्वतंत्र निकाल जाहीर केला जात असला तरी अराजपत्रित गट-ब संवर्गाकरीता एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल. तसेच गट-क संवर्गातील सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा वगळता अन्य सर्व संवर्गासाठी एकच संयुक्त गट-क परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

**६.५.१.३** सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गासाठी संबंधित परीक्षा योजनेनुसार स्वतंत्र मुख्य परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

**६.५.२ परीक्षेस प्रवेश:-**

**६.५.२.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या गुणांची किमान सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरण्याऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.५.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.५.२.३** संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास प्रत्येक संवर्गासाठी विहित पद्धतीने स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

**६.५.२.४** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता तसेच टंकलेखन अर्हता नसल्यास, शैक्षणिक व टंकलेखन अर्हता, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक व टंकलेखन अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे केलेल्या इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

७. निकाल प्रक्रिया:-

**७.१ महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब संयुक्त मुख्य परीक्षा, महाराष्ट्र गट-क संयुक्त मुख्य परीक्षा व सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गाकरीता स्वतंत्र निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.**

**७.२** सामाजिक तसेच समांतर आरक्षणाच्या वैध दाव्यांच्या आधारे संबंधित उमेदवार मुख्य लेखी परीक्षेमध्ये केवळ आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विहित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गाच्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७.३ महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा:-**

**७.३.१** उमेदवाराचा गुणवत्ताक्रम व पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना दिलेला संवर्गाचा विकल्प लक्षात घेऊन प्रथम पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येईल.

**७.३.२ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखत:-**

**(एक)** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**(दोन) शारीरिक चाचणी:-**

(१) उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

(२) शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(५) आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

(६) फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी अथवा आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या दिनांकास घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत त्याच दिवशी अथवा स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

(७) शारीरिक चाचणी एकूण १०० गुणांची असेल.

(८) शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ७० टक्के गुण (म्हणजेच ७० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

(९) शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवण्यात येईल.

(१०) शारीरिक चाचणीचा तपशील:-

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५ | (१) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - २० | (२) धावणे (४०० मीटर्स ) - कमाल गुण - ५० |
| (३) लांब उडी - कमाल गुण - १५ | (३) लांब उडी - कमाल गुण — ३० |
| (४) धावणे (८०० मीटर ) - कमाल गुण - ५० | |

**(तीन) मुलाखत:-**

(१) शारीरीक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

(२) पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता मुलाखत ४० गुणांची असेल.

(३) मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**७.४ महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा:-**

**७.४.१** उमेदवाराचा मुख्य लेखी परीक्षेमधील गुणवत्ताक्रम तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना दिलेला संवर्गाचा विकल्प लक्षात घेऊन प्रथम लिपिक-टंकलेखक व कर सहायक संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येईल.

**७.४.२ लिपिक-टंकलेखक व कर सहायक संवर्गाकरीता टंकलेखन कौशल्य चाचणी:-**

**७.४.२.१** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**७.४.२.२ टंकलेखन कौशल्य चाचणी:-**

**(१)** लिपिक-टंकलेखक तसेच कर सहायक संवर्गाकरीता संगणक प्रणालीवर आधारित स्वतंत्रपणे टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येतील.

**(२)** कर सहायक संवर्गाकरीता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही चाचणीमध्ये अर्हताकारी/पात्र (Qualify) ठरणे आवश्यक असेल.

**(३)** टंकलेखन कौशल्य चाचणी ही केवळ अर्हताकारी/पात्रता (Qualifying) स्वरुपाची असेल.

**(४)** दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अशा उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

**(५) टंकलेखन कौशल्य चाचणीचा तपशील:-**

| अ.क्र. | तपशील | | | निकष |
|---|---|---|---|---|
| (१) | चाचणीकरीता पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या | | | भरावयाच्या पदांच्या तीनपट |
| (२) | टंकलेखन कौशल्य चाचणीचे स्वरुप | लिपिक-टंकलेखक (मराठी) | | अर्हताकारी (Qualifying) |
| | | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | | अर्हताकारी (Qualifying) |
| | | कर सहायक | | दोन्ही भाषेत अर्हताकारी (Qualifying) |
| (३) | चाचणीचे निकष | | | |
| | **टंकलेखन** | **शब्द प्रतिमिनिट** | **KDPH (Key Depressions Per Hour)** | **वेळ** |
| | इंग्रजी | ४० | १२००० | १० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे) |
| | मराठी | ३० | ९००० | १० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे) |
| (४) | टंकलेखनाची गती मोजण्याची पध्दत | | | मजकुर संगणकावर विहित कालावधीत टंकलिखित करण्याच्या उमेदवाराच्या अचूकतेवर |
| (५) | चुका/त्रुटी गणण्याचे प्रमाण | | | दोन दशांशपर्यंत |
| (६) | त्रुटी/चुका मोजण्याची पध्दती | | | एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात |
| (७) | पात्रतेसाठी सीमांकन मर्यादा/रेषा | अराखीव | | ७% |
| | | मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अनाथ व दिव्यांग | | १०% |
| (८) | परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) ची उपलब्धता | | | अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार(लागू असल्यास) |

**(६)** लेखनिक/सहायकाची मागणी करणाऱ्या अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) उपलब्ध करुन देण्यात येईल. (लागू असेल त्याप्रमाणे)

**(७)** टंकलेखनातील त्रुटी/चुकांसंदर्भात एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात त्रुटी/चुका पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

**(८)** टंकलेखन कौशल्य चाचणी करीता उपस्थित उमेदवारांना संगणक/किबोर्ड/इत्यादी हाताळताना सुलभता व्हावी, याकरीता उमेदवारांना प्रत्यक्ष चाचणी सुरु होण्यापूर्वी १० मिनिटांची सराव चाचणी देता येईल. त्यानंतर ३ मिनिटांचा विश्रांतीकाळ राहील व तदनंतर १० मिनिटांची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात येईल.

**(९)** टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता उमेदवारांना संबंधित भाषेतील परिच्छेद तसेच सदर परिच्छेदातील कळ अवनमन संख्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

**७.५ गुणवत्ता यादी:-**

**७.५.१ महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा:-**

**७.५.१.१** शारीरिक चाचणी व मुलाखतीनंतर पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

**७.५.१.२** इतर संवर्गातील निवडीकरीता संबंधित मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

**७.५.२ महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा:-**

**७.५.२.१** टंकलेखन कौशल्य चाचणीनंतर मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे सर्व संवर्गासाठी एकत्रित गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**७.५.२.२** टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये अर्हताकारी ठरलेल्या उमेदवारांचा विकल्पानुसार कर सहायक तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गातील निवडीकरीता विचार करण्यात येईल.

**७.६ सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा:-**

मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

**७.७** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**७.८ अंतिम निकाल व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (ऑप्टिंग आऊट):-**

**७.८.१** अंतिम निकालासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) प्रथम वरील कार्यपद्धतीनुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे संवर्गाचा पसंतीक्रम सादर करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी संबंधित उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता उमेदवारांना नियुक्ती प्राधिकारीनिहाय पसंतीक्रम सादर करावा लागेल.

(४) उमेदवाराने पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गाकरीता तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत नियुक्ती प्राधिकारी निहाय दिलेला विकल्प व पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे उमेदवार ज्या संवर्गाच्या मुख्य परीक्षेसाठी आणि लिपिक टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यालयातील निवडीकरीता पात्र ठरला आहे; केवळ त्याच संवर्ग व नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यालयाकरीता उमेदवाराला पसंतीक्रम सादर करता येईल.

(५) उमेदवाराकडून प्राप्त पसंतीक्रमाच्या आधारे प्रचलित पध्दतीनुसार संवर्गनिहाय तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या बाबतीत नियुक्ती प्राधिकारीनिहाय तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

(६) तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

(७) तात्पुरती निवड यादी आयोगाच्या तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन संवर्गनिहाय अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**७.८.२** संवर्गाचे 'पसंतीक्रम सादर करणे' तसेच 'भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे' याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**८. शिफारस:-**

**८.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**८.२** पोलीस उपनिरीक्षक संवर्ग वगळता उर्वरित सर्व संवर्गाकरीता लेखी परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे.

**८.३** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता लेखी परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे.

**८.४** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी तसेच शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील:-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**
**(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत**
**(३) दिव्यांग - किमान २० शतमत**
**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत**
**(५) अनाथ - किमान ३० शतमत**
**(६) प्रकल्पग्रस्त - किमान ३० शतमत**
**(७) भूकंपग्रस्त - किमान ३० शतमत**
**(८) अंशकालीन पदवीधर कर्मचारी - किमान ३० शतमत**

**८.५** समांतर आरक्षणाच्या आधारे किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**८.६** शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**८.७** शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.


FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**९. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**९.१** संबंधित लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी लेखी परीक्षेच्या निकालापूर्वी, निकालानंतर अथवा नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

**९.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

**९.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**९.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**९.५** प्रमाणपत्र पडताळणी यासंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**९.६** केवळ अर्जातील दाव्यानुसार करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेले उमेदवार शिफारस/ नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

**१०.** प्रस्तुत परीक्षा योजना/परीक्षा पद्धतीत उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय अथवा आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक :- १९ जानेवारी, २०२३

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com